दि. ०६.०२.२०१७

# दयानंद कला महाविद्यालयात मतदान शपथविधी संपन्न

लातूर - दयानंद कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने फेब्रुवारी २०१७ मध्ये होणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुका डोळ्यासमोर ठेवून मतदारांनी मतदान करुन लोकशाही अधिक बळकट करावी यासाठी मतदार जनजागृती सप्ताहाचे आयोजन ०६-१२ फेब्रुवारी २०१७ दरम्यान करण्यात आले. त्याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये शपथविधी कार्यक्रम संपन्न झाला.

भारतीय संविधानाने १८ वर्ष पूर्ण झालेल्या सर्व नागरिकांना जात, धर्म, वंश, लिंग, प्रांत, भाषा, रंग असा कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता मतदानाचा अधिकार दिला आहे. हा अधिकार राष्ट्रउभारणीमध्ये व जडणघडणीमध्ये महत्त्वाचा आहे. त्यामुळे महाविद्यालयातील असंख्य विद्यार्थी, प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचाऱ्यांना मतदानाचा अमूल्य अधिकार बजावण्यासाठी तसेच मित्र परिवारातील व शेजारी असलेल्या परिचित व्यक्तींना मतदान करण्यासाठी प्रेरित व प्रोत्साहित करण्याची शपथ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. बिसेन यांनी दिली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या सल्लागार समितीचे सदस्य डॉ. संतोष पाटील यांनी केले.

सदरील कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. एस. पी. गायकवाड, उपप्राचार्य (क.म.) प्रा. शिवाजी पाटील, कार्यक्रमाधिकारी प्रा. गणेश लहाणे, प्रा. डॉ. अजंली जोशी, प्रा. संदीप जगदाळे, प्रा. डॉ. गोपाल बाहेती, प्रा. महेश जंगापल्ले, प्रा. सुधीर गाडवे, महाविद्यालयातील अनेक प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेचा विद्यार्थी प्रतिनिधी गोपाळ तुरुप व विद्यार्थिनी प्रतिनिधी कु. स्नेहा चामले सह महाविद्यालयातील ५८७ विद्यार्थी उपस्थित होते.

---